# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक १९/३/२००८ रोजी संपन्न झालेल्या अर्थसंकल्पीय स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.१८)**
**इतिवृत्त**

मंगळवार दिनांक **१९ मार्च २००८** रोजी मा.सभापती **श्री. त्र्यंबक गणपतराव तुपे** यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समितीची सभा, महानगरपालिका मुख्य कार्यालयातील 'मलिक अंबर स्थायी समिती सभागृह' येथे **सायं. ६.१० वाजता** "वंदे मातरम्" या गिताने सुरू झाली. या सभेस मा.आयुक्त, नगर सचिव व अधिकारी वर्गासह खालील सन्माननीय सभासद उपस्थित होते.

1. श्री. संजय शिरसाट
2. श्री. पुरूषोत्तम ठाकुर
3. श्रीमती जयश्री किवळेकर
4. श्री. हिंमतराव साळूबा दाभाडे
5. श्री. अ. रशीद खान (मामु)
6. श्री. संजय जोशी
7. श्री. मोहन मेघावाले
8. श्री. कचरू विश्वनाथ मोरे
9. श्री. मो. जावेद मो. इसाक
10. श्री.हाजी शेरखान अ. रहेमान

**विषय क्र. 462 :**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 95 अन्वये सन 2007-2008 चा सुधारीत व सन 2008-2009 या वर्षीचा मुळ अर्थसंकल्प स्थायी समिती समोर सादर करणे.

**संवाद :**

प्र.मुख्य लेखाधिकारी : मा.आयुक्त यांना विनंती की, मा.सभापती स्थायी समिती यांचेकडे कलम ९५ नुसार अर्थसंकल्प सादर करावा. मा.सभापती व सर्व स्थायी समितीच्या सदस्यांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत करावे.
(याच वेळी मा.आयुक्त सन २००७-०८ चा सुधारीत व सन २००८-०९ या वर्षाचा मुळ अर्थसंकल्प मा.सभापती स्थायी समिती यांचेकडे सादर करतात. तसेच मा.सभापती व सर्व स्थायी समितीचे सदस्य यांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत करतात.)

मा.सभापती : आज रोजी फक्त स. सदस्यांसाठी बजेट पुस्तके देण्यात आली उद्या सकाळी ११-०० वाजता प्रेसलाही देण्यात येतील तोपर्यत सर्वांना विनंती की कुठल्याही वृत्तपत्रात यातील माहिती शक्यतो येवू नये. ही सभा तहकूब करून २४ मार्च २००८ रोजी सकाळी १०-३० वाजता घेण्यात येईल. मा.आयुक्त हे सुरूवातीला अर्थसंकल्पाच्या संदर्भात प्रेझेन्टेशन करतील त्यानंतर यावर सविस्तर चर्चा होवून निर्णय घेण्यात येईल.

या बरोबर आजची सभा तहकूब केल्याचे मा. सभापती यांनी घोषीत केले.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद